**Dr. Kirit Somaiya**
**B.Com, FCA, Ph.D.**
*Ex-Member of Parliament*
*Member, BJP National Executive*
*Vice President, BJP Maharashtra*

**Bharatiya Janata Party**
**भारतीय जनता पार्टी**

प्रसिद्धीसाठी

ऑगस्ट २१. २००८

## मुलुंड-भांडुप भारनियमन - शून्याधारित भारनियमनाचा भंग केल्याबद्दल खुलासा करण्याचा एमइआरसीचा महावितरणला आदेश

एमइआरसीने महावितरणला "जुलैच्या मध्यावर मुलुंड-भांडुप क्षेत्रात अतार्किक आणि अवैध भारनियमन लागू केल्याबद्दल आणि शून्याधारित भारनियमनाचा बेकायदेशीरपणे भंग केल्याबद्दल" खुलासा करण्याचा आदेश दिला आहे. भाजप नेता, डॉ. किरीट सोमैय्या यानी दाखल केलेल्या विनंती अर्जाच्या सुनावणीच्या वेळी हा आदेश देण्यात आला.

डॉ. किरीट सोमैय्या, सरदार तारासिंग आणि अनय १३ सहयोगीनी मुलुंड-भांडुप क्षेत्रात ६-तासांचे भयानक भारनियमन पुन्हा सुरू केल्याबद्दल हा विनंतीअर्ज एमइआरसीकडे दाखल केला होता. अर्जदारांच्या मुख्य मागण्या अशा होत्याः

१. १५ जुलै २००८ नंतर लागू केलेले भारनियमन मागे घेण्यात यावे
२. असामान्य अतिरिक्त विश्वासार्हता आकाराचे स्पष्टीकरण
३. जून २००८ पासून वसूल करण्यात येत असलेल्या विसंगत अतिरिक्त सुरक्षा अनामतीचे स्पष्टीकरण आणि सुधारणा
४. टाटा/टिस्साकडून प्राप्त केलेल्या अतिरिक्त वीजेचा तपशील
५. शून्याधारित भारनियमनाचे पुणे मॉडेल या क्षेत्रात लागू करण्यातील असफलतेचे स्पष्टीकरण
६. महाराष्ट्र सरकार आणि महावितरणने मुंबई हा एकच विभाग मानावा आणि मुलुंड-भांडुप-कांजूरमार्ग क्षेत्रातील १५ लाख नागरिकांना मुंबईतील इतर नागरिकांच्या बरोबरीने वागवावे.

एमइआरसी ने असे प्रतिपादन केले कि महवितरणने सादर केलेल्या विनंतीवरून उक्त क्षेत्रात १३ मे २००८ रोजी शून्याधारित भारनियमनाचा आदेश देण्यात आला होता. ग्राहकांनी महावितरणला प्रति युनीट ४३ पैसे देण्यास मान्यता दिली तर त्यांना भारनियमनातून सूट दिली जाईल असे सांगून एमइआरसीकडे जाणारी महावितरण होती. या क्षेत्रासाठी अतिरिक्त वीज मिळविण्यासाठी त्यानी टाटा पॉवरसमवेत कराराही केला. असा करारा असतानाही महावितरण अतिरिक्त आकार आणि सुरक्षा अनामत का गोळा करीत आहे असे एमइआरसीने महावितरणला विचारले. मुलुंड-भांडुप क्षेत्र भारनियमन मुक्त घोषित केलेले असताना महावितरण या क्षेत्रात भारनियमन कसे लागू करू शकते.

डॉ. सोमैय्या यानी असे सांगितले कि महवितरणला कोणतेही समाधानकारक उत्तर देता आले नाही. महावितरण आणि महाराष्ट्र सरकारची अकार्यक्षमता आणि बेजबाबदारपणा हीच मुलुंड-भांडुप-कांजूरमार्ग क्षेत्रातील या भयानक तासाची कारणे आहेत. सुनावणीच्यावेळी, या क्षेत्राबरोबरच ठाणे, नवी मुंबई आणि पुणे येथील विसंगत भारनियमनाचा विषयही पुढे आला.

महावितरणाला पुढील ७ दिवसांच्या आत स्पष्टीकरण सादर करण्याचा आदेश देण्यात आला.

*प्रसिद्धी सचिव*

**BJP Office :** ● 11, Ashoka Road, New Delhi 110 001

➔**Please Reply :** 9C, Neelam Nagar, Mulund (E), Mumbai 400 081- Tel21639649/21634152
(M)9869220027 ● Fax : 21637432 - Email: kirit@vsnl.in, neelamnagar@rediffmaill.com
Website : www.kiritsomaiya.com